जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७७०** **दिनांक - ३०/१०/२०२३**

उत्तमनगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## बाबुलाल मोहोळ (टोळी प्रमुख) व त्याचे ०३ साथीदार यांचे टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक १३/०९/२०२३ रोजी फिर्यादी यांची आई व त्यांची सहकारी यांना रुद्र हॉटेल जवळ,देशमुखवाडी, उत्तमनगर,पुणे येथे यातील नमुद इसम बाबुलाल मोहोळ यांनी बोलाविल्याने गेल्या असताना, सदर ठिकाणी बाबुलाल मोहोळ व त्याचे साथीदार फिर्यादी यांचे आईला म्हणाले की रेल्वे स्टेशनचे बाहेरील स्टॉल मिळवुन देण्याचे काम तु केले नाहीस,तरी तु आमचेकडून ६ लाख रुपये घेतले आहे. तु आम्हाला स्टॉल दिले नाहीत म्हणुन आमचा तोटा झालेला आहे असे म्हणुन फिर्यादी यांचे आईला मारहाण करुन तुला आता ६ लाख रुपयेच्या बदल्यात १७ लाख रुपये दयावे लागतील, पैसे दिले नाहीतर तुला जिवंत सोडणार नाही,अशी धमकी देवुन जबदरस्तीने फिर्यादी यांचे आईस व त्यांची सहकारी यांना त्यांचेकडील गाडीत बसवुन बाबुलाल मोहोळ यांचे घरात नेवुन डांबुन ठेवले होते. म्हणुन आरोपी नामे १)बाबुलाल लक्ष्मण मोहोळ २)अमर नंदकुमार मोहिते ३)प्रदिप प्रभाकर नलवडे ४)अक्षय मारुती फड यांचेविरुद्ध **उत्तमनगर पोलीस ठाणे,पुणे शहर येथे गु.रजि.नं.९६/२०२३,भा.दं.वि.कलम ३८५,३८७,३६४(अ),३४१,३२३,५०४,५०६,३४** अन्वये गुन्हा नोंद करणेत आला आहे.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान आरोपी नामे **१)बाबुलाल लक्ष्मण मोहोळ,वय ४५ वर्षे,रा.सरडेबाग, उत्तमनगर पुणे २)अमर नंदकुमार मोहिते,वय ३९ वर्षे,रा.गणेशनगर,एरंडवणा,ओटा वसाहत,पुणे.३)प्रदिप प्रभाकर नलवडे,वय ३८ वर्षे,रा.राजगुरु अपार्टमेंट,भुगाव,पुणे ४)अक्षय मारुती फड,वय २४ वर्षे,रा.अमर भारत सोसायटी,वारजे माळवाडी,पुणे** यांना अटक करणेत आली आहे.

वरील आरोपीचे पुर्व रेकॉर्डची पाहणी करता आरोपी नामे **बाबुलाल लक्ष्मण मोहोळ (टोळी प्रमुख)** व त्याचे साथीदारासह त्याने बेकायदेशीर मार्गाने अवैध आर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने, तसेच कोथरुड, अलंकार,उत्तमनगर या भागात आपले गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करणेचे उददेशाने गुन्हयातील साथीदार आरोपीतांना स्वतःबरोबर घेवून स्वतःचे अधिपत्याखाली आपली संघटित गुन्हेगारी टोळी स्थापन केलेली आहे. त्याचेवर यापुर्वी पुणे शहरातील तसेच पुणे ग्रामीण हद्दीतील पोलीस ठाणेस खुनाचा प्रयत्न,दरोडा,मारामारी, गैर कायदयाची मंडळी जमवणे,बेकायदा घातक शस्त्र जवळ बाळगणे,शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन,खंडणी गोळा करणे अशा प्रकारचे एकुण १० गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तसेच आपल्या संघटित गुन्हेगारी टोळीचे अस्तित्व,वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी दहशत निर्माण केली आहे. यातील नमुद सदस्यांवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहे.

दाखल गुन्हया मध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(II),३(४) प्रमाणे चा अंतर्भाव करणेकामी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तमनगर पोलीस स्टेशन पुणे शहर श्री.किरण बालवडकर यांनी मा.पोलीस उपायुक्त परी-०३ पुणे शहर श्री.सुहेल शर्मा व मा.सहा.पोलीस आयुक्त, कोथरुड विभाग पुणे शहर श्री.भीमराव टेळे यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री.प्रवीणकुमार पाटील,यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन उत्तमनगर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गु.रजि.नं.९६/२०२३ भा.दं.वि. कलम ३८५,३८७,३६४(अ),३४१,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(II),३(४) चा अंतर्भाव करणेबाबत मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री,प्रवीणकुमार पाटील,यांनी मंजुरी दिली आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग पुणे शहर श्री.भीमराव टेळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री रितेश कुमार,मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर, श्री.संदीप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रवीणकुमार पाटील, मा.पोलीस उपायुक्त,परी ३ पुणे,श्री.सुहेल शर्मा, मा.सहा.पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग,पुणे,श्री.सुनिल पवार, तत्कालीन यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.किरण बालवडकर, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती.शबनम शेख,सपोनि.दादाराजे पवार,सपोनि.उमेश रोकडे,निगराणी पथकातील पोलीस अंमलदार,पवार,गायकवाड, म.पोलीस अंमलदार खाडे व तपास पथकातील पोलीस अंमलदार नांगरे,पाडाळे,तोडकर यांनी केलेली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालय,पुणे शहराचा कार्यभार स्वीकारल्यानंतर गुन्हेगारी नियत्रणावर बारकाईने लक्ष देवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर अधिक भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देणेत आलेले आहेत.**त्यांचे मार्गदर्शनाखालील मकोका अंतर्गत केलेली ही ७३ वी कारवाई आहे.**